महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला माळा, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र२५७५६१५ ., २३१७९३८फॅक्स क्र.२५७९२०८ .
ई -: मेल-ednctd.nsk-mh@gov.in वेबसाईट -:www.mahatribal.gov.in

क्र.शावगृ -2026/प्र.क्र.15/का.9(2)/ ५७८७ दिनांक :- 18.06.2026.

**तातडीचे /कालमर्यादा.**

**प्रति,**

1. अपर आयुक्त,
   आदिवासी विकास,
   नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.
2. प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,------- (सर्व.)
3. गृहप्रमुख,गृहपाल,आदिवासी मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह------ सर्व.

**विषय** :- शैक्षणिक वर्ष सन 2026-27 करीता शासकीय वसतीगृह प्रवेश व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना प्रवेशाच्या अनुषंगाने प्रवेश वेळापत्रक व आवश्यक सुचना निर्गमित करणेबाबत..

**संदर्भ** :- आयुक्तालयाचे समक्रमांकीत पत्र क्र.3628,दिनांक 30.04.2026.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाचे शालेय वर्गाच्या इयत्ता 8 वी ते 9 वी परिक्षेचा, त्याचप्रमाणे इयत्ता 10 वी व 12 वी चे निकाल जाहिर झालेला आहेत. शैक्षणिक संस्था स्तरावर विद्यार्थ्यांच्या सन 2026-27 या वर्षाकरीता प्रवेशाबाबतची कार्यवाही सुरू झालेली आहे. सन 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठीचे दिनांक 15 जुन 2025 रोजीपासून शाळा, विद्यालये व महाविद्यालये सुरु झाले आहेत.त्यानुषंगाने आदिवासी मुला/मुलींच्या शासकीय वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेबाबत पुढील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. त्याचे तंतोतंत पालन प्रकल्प अधिकारी,गृहप्रमुख व गृहपाल यांनी करावे.तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना वसतिगृह प्रवेशाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी व समस्या निर्माण होणार नाहीत याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

अभ्यासक्रमाच्या आरक्षणानिहाय वसतीगृह प्रवेशाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील.त्या वेळापत्रकाप्रमाणे स्थानिक परिस्थितीनुसार दिलेल्या दिनांकापर्यंत अर्ज स्विकारून वसतिगृह प्रवेशाची पहिली, दुसरी व तिसरी यादी प्रसिध्द करून नमूद दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी आरक्षणानुसार त्या-त्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया अंतिम करावी. मोठ्या शहराच्या ठिकाणी शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया उशिरापर्यंत चालते अशी ठिकाणे वगळता ज्या ठिकाणी शाळा/महाविद्यालयांची संख्या अत्यंत कमी असेल अशा ठिकाणी स्थानिक परिस्थितीचा विचार

करून प्रवेशाची कार्यवाही दिलेल्या वेळेपूर्वी पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकारी,गृहप्रमुख व गृहपाल यांची राहील.

1. **शासकीय वसतीगृह व स्वयंम योजना ऑनलाईन अर्ज सुरु करण्याचे वेळापत्रक.**

| Sr. No | Course Level | Hostel | | Swaym |
|---|---|---|---|---|
| | | New | Renew | Renew |
| 1 | Pre-Matric | 16-06-2026 | 04-06-2026 | - |
| 2 | Junior College | 01-07-2026 | 04-06-2026 | - |
| 3 | Diploma | 01-07-2026 | 01-07-2026 | 01-07-2026 |
| 4 | Graduation | 01-07-2026 | 01-07-2026 | 01-07-2026 |
| 5 | Post-Graduation | 01-07-2026 | 01-07-2026 | 01-07-2026 |
| 6 | Professional | 01-07-2026 | 01-07-2026 | 01-07-2026 |

2. **शासकीय वसतीगृह गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्याचे वेळापत्रक.**

| Sr. No | Course Level | Hostel | | |
|---|---|---|---|---|
| | | From | To | Merit List Publish Date |
| 1 | Pre-Matric | 16-06-2026 | 30-06-2026 | 06-07-2026 |
| 2 | Junior College | 01-07-2026 | 15-07-2026 | 22-07-2026 |
| 3 | Diploma | 01-07-2026 | 15-07-2026 | 22-07-2026 |
| 4 | Graduation | 01-07-2026 | 15-07-2026 | 22-07-2026 |
| 5 | Post-Graduation | 01-07-2026 | 15-07-2026 | 22-07-2026 |
| 6 | Professional | 01-07-2026 | 15-07-2026 | 22-07-2026 |

3. उपरोक्त प्रमाणे आयुक्तालयामार्फत प्रसिद्दध करण्यात आलेल्या वेळापत्रका प्रमाणे प्रथम गुणवत्ता यादी प्रसिद्ध झालेनंतर जो पर्यत वसतीगृहाचे मंजूर क्षमतेनुसार प्रवेश प्रक्रिया पुर्ण होत नाही,तो पर्यंत खालील प्रमाणे प्रवेश वेळापत्रक वसतीगृहाच्या रिक्त जागेच्या अनुषंगाने सुरु राहील.
   - ✓ विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म अर्ज करणेसाठी 15 दिवस.
   - ✓ पुढील कार्यालयीन कामकाजाचे चार दिवस गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणेसाठी.
   - ✓ गुणवत्ता यादी प्रसिद्ध केले नंतर पुढील रिक्त राहणाऱ्या जागेचे विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करणेसाठी 15 दिवस.

4. **शासकीय वसतिगृह प्रवेशाबाबत मार्गदर्शक सुचना.**

1) वसतीगृह प्रवेशाबाबत खालील नमूद मार्गदर्शक सुचनांचा फलक वसतीगृहाच्या दर्शनी भागात लावण्यात यावा.
2) विभागामार्फत विकसीत करण्यात आलेल्या https://mahatribal.gov.in या प्रणालीवर वेळोवेळी वसतीगृह योजनेच्या प्रवेश व रिक्त जागांची सद्यस्थिती अद्यावत करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकारी यांची राहील.

3) प्रत्येक वसतीगृहाची सन 2026-27 मधील समांतर आरक्षणानुसार अभ्यासक्रमनिहाय रिक्त जागांची तपशिलवार माहिती प्रसिध्द करण्यात यावी.

4) शासकीय वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीवरील सर्वच अर्ज काळजीपुर्वक पडताळणी करण्याची जबाबदारी गृहपाल यांची राहील.पात्र अर्जांचा वसतीगृह प्रवेशाकरीता विचार करण्यात यावा,अपात्र अर्ज मंजुर होणार नाही याची जबाबदारी गृहपाल यांची राहील.

5) आयुक्त,कार्यालयामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या वेळापत्रकानुसारच गुणवत्ता यादी व शासकीय वसतीगृह प्रवेश प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी गृहपाल व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

6) शासकीय वसतीगृहात गुणवत्ता यादीनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांने जर वसतीगृहात प्रवेश घेतला नाही तर त्याचा प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.अशा विद्यार्थ्यांचा कोणत्याही परिस्थितीत स्वयंम योजनेकडे अर्ज वर्ग करण्यात येणार नाही,व त्यांना स्वयंम योजनेचा लाभ देता येणार नाही. याची संपुर्ण जबाबदारी संबंधित गृहप्रमुख,गृहपाल व प्रकल्प अधिकारी यांची राहील.

7) शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी विद्यार्थ्यांचे नविन व नुतनिकरण प्रवेश निश्चीत करतांना विद्यार्थ्यांचे विद्यापिठामार्फत महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष प्रत्यक्ष सुरु होत असलेल्या दिनांकाची पडताळणी स्वताः करण्यात यावी.तद्नंतरच त्याचा वसतीगृह प्रवेश महाविद्यालय सुरु होण्याच्या दोन दिवस आगोदर निश्चीत करण्यात यावा.सदर विद्यार्थी वसतीगृहात हजर झाले नंतर त्या दिनांकापासून वसतीगृह सर्व देय सोई-सुविधा व डी.बी.टी चा लाभ देय राहील.

8) व्यावसायीक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही उशिराने होत असल्याने त्यांचे करीता आरक्षित असलेल्या जागा रिक्त ठेवण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

9) नविन प्रवेशाची गुणवत्ता यादी गृहपाल यांनी प्रकल्प अधिकारी यांचेकडे सादर केलेनंतर ती 3 दिवसाच्या आंत प्रसिद्द्ध करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प अधिकारी यांची राहील.

10) वसतीगृह मंजूर क्षमता 100 टक्के पुर्ण झालेनंतरच गृहपाल यांनी स्वयंम योजनेत विद्यार्थ्यांचे अर्ज वर्ग करण्यात यावे.तसेच वसतीगृह क्षमता 100 टक्के पुर्ण भरल्याचे गृहपाल यांचे प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच प्रकल्प अधिकारी यांनी नियमानुसार स्वयंम करीता अर्ज वर्ग करावेत.

11) स्वयंम योजनेचा लाभ हा विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालय प्रत्यक्ष सुरु झाल्याच्या दिनांकापासून देय आहे,तथापी त्याबाबत प्रत्यक्ष महाविद्याल सुरु झाल्याच्या दिनांकाची खात्री प्रकल्प अधिकारी यांनी गृहपाल यांच्या मदतीने करणे बंधनकारक राहील.

12) संबंधित वसतीगृहाचे गृहपाल यांनी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याच्या बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक, बैंक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असल्याची खात्री करावी.

13) गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थ्यांची निवड झालेनंतर विद्यार्थ्यांनी 07 दिवसाच्या आंत त्यांचा वसतीगृह प्रवेश निश्चीत करावा.विद्यार्थ्यांने त्याचा वसतीगृह प्रवेश निश्चीत केला नाही तर

त्याचा प्रवेश रद्द करुन त्याच्या रिक्त होणाऱ्या जागेवर पुढील गुणवत्ता यादीतील /प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.तथापी, विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश पत्र विहीत वेळेत प्राप्त होईल याबाबत संबंधित गृहपाल यांनी दक्षता घेण्यात यावी.

14) शासकीय वसतीगृह योजनेतील जुन्या विद्यार्थ्यांचे नुतनिकरणाचा प्रवेश अर्ज महाविद्यालयात प्रवेश निश्चीत झालेनंतर 15 दिवसाच्या आत नुतनिकरण करण्याची जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्यांची राहील.प्रवेश निश्चीत झालेनंतर 30 दिवसाचे आत नुतनिकरण झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.

15) संबंधित गृहपाल यांनी त्यांच्या जुन्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नुतनिकरण करण्या करीता विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संपर्क करुन त्यांना प्रवेश घेणेबाबत अवगत करावे.तद्नंतर विहीत वेळेत विद्यार्थ्यांनी योजनेचा अर्ज सादर न केल्यास त्याचा प्रवेश रद्द करुन त्याच्या रिक्त होणाऱ्या जागेवर नविन विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चीत करावा.

16) नविन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या वैयक्तिक ऑनलाईन लॉगिंनवर त्यांनी केलेल्या अर्जाची स्थिती वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

17) प्रकल्प अधिकारी यांनी सर्व गृहप्रमुख,गृहपालांची बैठक घेऊन उपरोक्त प्रमाणे सुचना संबंधित गृहपाल यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. वसतिगृह प्रवेशाबाबत स्वतंत्र आदेश काढून कर्मचाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात यावी,

18) शासकीय वसतीगृह व स्वयंम योजनेच्या प्रवेश प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक व सुचना याला गृहपाल आणि प्रकल्प अधिकारी यांनी व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी,त्यासाठी महाविद्यालय,वसतीगृह, प्रकल्प कार्यालयांच्या दर्शनीभागात, स्थानिक वृत्तपत्रात विनामुल्य जाहीरात प्रसिद्धी तसेच सोशल मिडीयाच्या माध्यामातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

Leena MBansod

**लीना बनसोड,भा.प्र.से**
**आयुक्त,आदिवासी विकास**
**महाराष्ट्र राज्य,नाशिक.**

**प्रत-** मा.सचिव,आदिवासी विकास,विभाग मंत्रालय विस्तार,मुंबई-32.